



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३५६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०६ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## ‘ज्ञानयुगाचा दीप’ मालवला; पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना कोल्हापूरचा अश्रुपूर्ण अखेरचा निरोप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, कोल्हापूर :** शिक्षण, समाजसेवा आणि आरोग्य क्षेत्रात अमिट ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी राज्यपाल आणि पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्यावर बुधवारी सायंकाळी कोल्हापूरातील कसबा बावडा येथील पॅव्हेलियन मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांचे निधन झाल्यानंतर संपूर्ण कोल्हापूरसह राज्यभरातून शोक व्यक्त करण्यात आला. त्यांच्या पार्थिवाला तिरंगा झेंड्यात लपेटून पोलीस दलाने बंदुकींच्या फैरी झाडत मानवंदना दिली.

पद्मश्री डॉक्टर डी वाय पाटील यांच्या निधनानंतर अंतिम दर्शनासाठी त्यांचे पार्थिव कसबा बावडा येथील ’यशवंत निवास’ येथे ठेवण्यात आले होते. दिवसभर हजारो नागरिक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रांगा लावत आपल्या लाडक्या ‘दादा’ना अखेरचा निरोप दिला.

सायंकाळी कुटुंबाकडून धार्मिक विधी पार पडल्यानंतर दुपारी ४ वाजता सुरू झालेली अंत्ययात्रा मेडिकल कॉलेज, लाईन बाजार, भगवा चौक आणि कसबा बावड्यातील प्रमुख मार्गांवरून पॅव्हेलियन मैदानामध्ये पोहोचली. या संपूर्ण मार्गावर नागरिकांनी पुष्पवृष्टी करत डी. वाय. दादा अमर रहे अशा घोषणांनी वातावरण भारावून टाकले.

डॉक्टर डी वाय पाटील यांच्या पार्थिवाच्या अंत्यदर्शनासाठी मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह विविध पक्षांचे वरिष्ठ नेते, मंत्री, खासदार, आमदार तसेच शैक्षणिक कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. डी. वाय पाटील यांची अंत्ययात्रा अंत्यविधीस्थळी पोहोचल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण केले. तसेच सुशीलकुमार शिंदे, हसन मुश्रीफ, प्रकाश आबिटकर, शाहू छत्रपती, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, अंबादास दानवे, राजू शेट्टी, संभाजीराजे छत्रपती, विश्वजित कदम, अमित देशमुख, यशोमती ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करत श्रद्धांजली वाहिली.

अंत्यसंस्कारावेळी डी. वाय. पी. समूहाचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी पार्थिवाला मुखाग्नी दिला. त्या क्षणी उपस्थित हजारो नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. पाटील कुटुंबीयांसह आमदार सतेज पाटील, विजय पाटील, अजिंक्य पाटील आणि ऋतुराज पाटील आणि सर्व कुटुंबीय उपस्थित होते. एका सामान्य शेतकरी कुटुंबातून प्रवास सुरू करत डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षणाच्या बळावर देशभरात शेकडो शैक्षणिक संस्था आणि अनेक विद्यापीठांचे जाळे उभे केले. बिहार, त्रिपुरा आणि पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. शिक्षणाबरोबरच आरोग्य, क्रीडा आणि समाजसेवा क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे ते देशभर आदराचे स्थान मिळवू शकले.

दरम्यान, कसबा बावडा परिसरातील अनेक व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली. पॅव्हेलियन मैदानावर जनसागर उसळला होता. एका युगपुरुषाचा प्रवास संपला असला, तरी त्यांनी उभारलेला शिक्षणाचा विशाल वारसा आणि लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात पेटवलेला ज्ञानाचा दीप पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहणार आहे.

## चंद्रपूर येथे बंगळुरु - हझरत निजामुद्दीन राजधानी एक्सप्रेस चा थांबा द्या : खा. प्रतिभा धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर रेल्वे स्थानकावर गाडी क्रमांक २२६९१/२२६९२ के.एस.आर. बंगळुरु – हझरत निजामुद्दीन राजधानी एक्सप्रेस चा थांबा मंजूर करण्यात यावा, यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यांच्या या मागणीची तातडीने दखल घेत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या विषयावर चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याचे पत्र पाठवले आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी १७ जुलै २०२६ आणि १८ जुलै २०२६ रोजी रेल्वेमंत्र्यांना पत्र लिहून चंद्रपूर आणि परिसरातील प्रवाशांच्या सोयीसाठी राजधानी एक्सप्रेसला चंद्रपूर स्थानकावर थांबा देण्याची आग्रही मागणी केली होती. चंद्रपूर हे जिल्ह्यातील महत्वाचे औद्योगिक व व्यावसायिक केंद्र असल्याने येथे राजधानी एक्सप्रेसला थांबा मिळणे अत्यंत गरजेचे आहे, ही बाब त्यांनी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. या पत्राची दखल घेत



केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी २९ जुलै २०२६ रोजी खासदार प्रतिभा धानोरकर यांना दिलेल्या अधिकृत पत्रात स्पष्ट केले आहे की, खासदार महोदयांनी उपस्थित केलेल्या चंद्रपूर रेल्वे स्थानकावरील राजधानी एक्सप्रेसच्या थांब्याबाबत आणि इतर संबंधित विषयांची चौकशी सुरु करण्यात आली असून तपासणीनंतर योग्य ती आवश्यक कारवाई केली जाईल.

चंद्रपूरच्या नागरिकांसाठी आणि रेल्वे प्रवाशांसाठी हा एक अत्यंत महत्वाचा विषय असून, लवकरच सकारात्मक निर्णय होईल असा विश्वास खा. प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केला आहे.

## एसआयआर प्रक्रियेला दुसऱ्यांदा मुदतवाढ अंतिम मतदार यादी आता २७ ऑक्टोबरला

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि .०५, मुंबई :** भारत निर्वाचन आयोगाने महाराष्ट्रातील १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या वेळापत्रकात बदल केला आहे.

**सुधारित कार्यक्रमानुसार खालीलप्रमाणे टप्पे पार पडतील :-**

**घरोघरी भेट :** बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्यामार्फत ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन मोहीम राबवली जाईल.

**पोलिंग स्टेशनची पुनर्रचना :** मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण व पुनर्रचना १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण केली जाईल.

**मसुदा (ड्राफ्ट) प्रसिद्धी :** मतदार यादीचा मसुदा २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल.

दावे व हरकती: २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे आणि हरकती स्वीकारल्या जातील.

**सुनावणी आणि निकाल :** प्राप्त झालेल्या दाव्यांवर व हरकतींवर सुनावणी घेऊन ते निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत चालेल. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती भारत निर्वाचन आयोगाने दिली आहे.

## स्वातंत्र्यदिनापासून खतांची ऑनलाईन बुकिंग सुविधा सुरू; घरबसल्या साठा पाहून करता येणार बुकिंग

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** शेतकऱ्यांना रासायनिक खतांची उपलब्धता अधिक सुलभ व पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी कृषी विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या १५ ऑगस्ट म्हणजेच स्वातंत्र्यदिनापासून नाशिकसह राज्यातील १२ जिल्ह्यांत खतांची ऑनलाईन बुकिंग सुविधा सुरू होणार आहे. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे घरबसल्या जवळच्या कृषी सेवा केंद्रातील खतांचा शिल्लक साठा पाहून थेट बुकिंग करता येणार आहे.

**तीन दिवस साठा ठेवणे बंधनकारक**

शेतकऱ्याने ऑनलाईन बुकिंग केल्यानंतर संबंधित खत विक्रेत्याने तीन दिवसांपर्यंत तो खत साठा राखून ठेवणे बंधनकारक असणार आहे. या निर्धारित तीन दिवसांच्या कालावधीत शेतकऱ्याने कृषी सेवा केंद्रावर जाऊन पैसे भरून आपल्या खताचा ताबा घ्यायचा आहे.

**या १२ जिल्ह्यांत प्रायोगिक अंमलबजावणी**

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवून यशस्वी ठरल्यानंतर आता नाशिक, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, लातूर, धाराशिव आणि गडचिरोलीसह एकूण १२ जिल्ह्यांत लागू करण्यात येत आहे. या सुविधेमुळे जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून खतांचा तुटवडा, दुकानांवरील अनावश्यक गर्दी आणि संभाव्य काळाबाजार रोखण्यास मदत होईल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

**अशी असेल ऑनलाईन बुकिंग प्रक्रिया:**

**ॲप डाऊनलोड व नोंदणी :** सर्वात आधी मोबाईल ॲपवर आपली नोंदणी करून लॉगिन करावे.

**साठा पाहणे :** आपल्या जवळचे कृषी सेवा केंद्र निवडून तेथील उपलब्ध रासायनिक खतांचा साठा तपासावा.

**बुकिंग करणे :** आवश्यक असलेल्या खताची ऑनलाईन बुकिंग करावी.

**खत ताबा घेणे :** बुकिंग झाल्यापासून तीन दिवसांच्या आत संबंधित केंद्रावर जाऊन पैसे जमा करावेत व खत ताब्यात घ्यावे.

**ऑनलाइन पेमेंटची सुविधाही उपलब्ध व्हावी**

रासायनिक खतांचा होणारा काळाबाजार आणि कृत्रिम तुटवडा रोखण्यासाठी शासनाने उचललेले हे पाऊल अत्यंत अभिनंदनीय आहे. मात्र, ऑनलाईन बुकिंग केल्यानंतरही प्रत्यक्ष खत उचलताना दुकानदार शेतकऱ्यांकडे वाढीव रक्कमेची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने ऑनलाईन बुकिंगसोबतच ऑनलाईन पेमेंटची सुविधा देखील उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही.

**– प्रकाश पाटील**
**(माजी पंचायत समिती सदस्य)**

## वरोरा– भद्रावती विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा-भद्रावती विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्कर ताजने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून ग्रामीण भागातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.


भद्रावती –वरोरा परिसरातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडलेले असून सामान्य नागरिकांना प्रवास करणे धोकादायक व त्रासदायक बनले आहे. भद्रावती तालुक्यातील घोडपेठ, कचराळा, मूर्सा- पिपरी, घोडपेठ गोरजा, सुमठाणा, चिरादेवी, तेलवासा, भद्रावती, देऊरवाडा आदी गावांना जोडणारे रस्ते अत्यंत दयनीय अवस्थेत आहेत. याशिवाय शेतकऱ्यांच्या शेतशिवारात जाणारे जाणारे रस्तेही मोठ्या प्रमाणात खराब झाले असून शेतीची कामे करताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासासाठी तसेच शेतकऱ्यांच्या सोयीसाठी गाव रस्ते व शिवार रस्ते किमान वाहतुकीयोग्य तरी करण्यात यावेत, अशी मागणी भास्कर ताजने यांनी यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनातून केली आहे.

## म्हसणे येथे नवबुद्ध दलित वस्ती सुधार योजनेतील रस्ता कामात अनागोंदी ; ग्रामस्थांमध्ये संताप

**अक्षराज; राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील म्हसणे सुलतानपूर गावांमधील गायकवाड मळा येथे ‘नवबुद्ध व दलित वस्ती सुधार योजने’मधून करण्यात आलेल्या रस्ता काँक्रिटीकरण कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. जनशक्ती सामाजिक असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष प्रतिक विलास शेळके यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय पारनेर यांच्याकडे यासंदर्भात सविस्तर तक्रार दाखल केली असून, संबंधित दोषी अभियंता आणि ठेकेदारावर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, म्हसणे येथील गायकवाड मळा रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत ९ मार्च २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयात पहिली तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत पंचायत समितीचे अभियंता बेरड यांनी घटनास्थळी पाहणी केली होती. यावेळी ठेकेदाराला अंदाजपत्रकानुसार (एस्टिमेटप्रमाणे) काम करण्याबाबत तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतरही सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ठेकेदाराने आपसात मिळून अभियंता बेरड यांना हाताशी धरले. रस्त्याचे मजबुतीकरण अत्यंत निकृष्ट दर्जाचे असतानाही घाईघाईने त्यावर काँक्रिटीकरण करण्यात आले.



या प्रकाराची तक्रार करण्यासाठी जेव्हा अर्जदार प्रतिक शेळके यांनी अभियंता बेरड यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला, तेव्हा त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. यावरून अभियंता बेरड यांनी ठेकेदारासोबत आर्थिक हितसंबंध जोडून कामामध्ये अनियमितता केल्याचा व त्यांना पाठीशी घातल्याचा संशय बळावला आहे. त्यामुळे हलगर्जीपणा करणाऱ्याला आणि ठेकेदाराला अभय देणाऱ्या संबंधित अभियंत्यावर कायदेशीर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या रस्त्याच्या कामात अनेक गंभीर त्रुटी उघडकीस आल्या आहेत. नियमानुसार काम सुरू होण्याआधी कामाचा फलक (बोर्ड) लावणे बंधनकारक असताना, संपूर्ण काम पूर्ण झाल्यानंतर फलक लावण्यात आला. तसेच, ८० मिमीचे दगड हाताने फोडून वापरणे अपेक्षित असताना त्या ठिकाणी वेळेचे खरपड (चुकीची सामग्री) वापरण्यात आली आहे. रस्त्याच्या बाजूच्या अरुंदीकरणासाठी पुरेशी जागा न सोडल्यामुळे साईड भरणे अशक्य झाले असून त्याठिकाणी मुरूम न टाकता माती टाकण्यात आली आहे, रस्ता पूर्ण लेव्हलमध्ये न करता तिथे चढ-उतार ठेवण्यात आले आहेत. शिवाय, अंदाजपत्रकात खडीचा डबल लेयर बंधनकारक असताना प्रत्यक्षात सिंगल लेयरच वापरल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व गंभीर अनियमिततेबाबत पंचायत समितीच्या गुण नियंत्रण कक्षाकडून (क्वालिटी कंट्रोल) रस्त्याच्या कामाची सखोल तपासणी करण्यात यावी आणि त्यानंतरच ठेकेदाराचे बिल अदा करावे, अशी मागणी अर्जात करण्यात आली आहे. अन्यथा, या अर्जाची दखल न घेतल्यास जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर यांच्यासमोर १८ ऑगस्ट रोजी आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा मुसळधार पाऊस, आयएमडीचा मोठा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, पुणे :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे, समाधानकारक पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांना देखील मोठा दिलासा मिळाला आहे. पुन्हा एकदा आयएमडीकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार पुढील दोन दिवस पुणे जिल्ह्यातील घाट माथ्यावर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तसेच कोकण किनारपट्टीच्या प्रदेशात देखील पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, मध्य महाराष्ट्रात पुढील काही दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मात्र त्यानंतर सहा तारखेपासून राज्यातील पावसाचं प्रमाणा कमी होईल, साधारण पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान तज्ज्ञ एस. डी सानप यांच्याकडून वर्तवण्यात आला आहे. मराठवाडा आणि विदर्भात गेले काही दिवस चांगला पाऊस झाल्याने जून महिन्यात पावसाची जी तूट झाली होती, ती काही प्रमाणात भरून निघाली आहे.




## खासगी कर्जांचे काय?

महाराष्ट्र सरकारची नवीन शेती कर्जमाफी योजना मंजूर झाली आहे. राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू होईल. या योजनेअंतर्गत ३६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित असून सुमारे ५६ लाख थकबाकीदार शेतकरी कर्जमुक्त होतील. तसेच ज्यांनी नियमितपणे कर्जफेड केली आहे, अशा शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद या योजनेत आहे. त्यामुळे ही योजना पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व पात्र शेतकरी कर्जमुक्त होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र ही अपेक्षा पूर्ण वास्तव दाखवत नाही. कारण ही योजना बँका, सहकारी सोसायट्या किंवा अधिकृत वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांपुरती मर्यादित आहे. खासगी सावकार, व्यापारी, नातेवाईक किंवा मित्रमंडळींकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना याचा कोणताही लाभ मिळणार नाही. हे शेतकरी कर्जबाजारीच राहणार आहेत, ही बाब लक्षात घ्यायला हवी. वस्तुतः शेतकरी समाजातील सर्वांत दुर्बल आणि वंचित घटक नेमका हाच आहे. कर्जमाफीचा जो गाजावाजा सध्या सुरू आहे त्यात या घटकाची दखलही घेतली जात नाही, ही गंभीर आणि दुर्दैवी बाब आहे. खासगी कर्जाची व्याप्ती मोजणे हे सोपे काम नाही. कारण या कर्जातील मोठा भाग वैयक्तिक, तोंडी आणि अनौपचारिक व्यवहारांवर आधारित असतो. किती शेतकऱ्यांनी कर्ज घेतले, किती रक्कम घेतली, कोणत्या दराने घेतली या संदर्भातील अधिकृत माहिती सहज मिळत नाही. त्याचा तपशील मिळत नाही. रिझर्व्ह बँकेच्या एका अभ्यासगटाने केलेल्या अभ्यासानुसार, २०१९ च्या सुमारास शेतीतील खासगी कर्जाचे प्रमाण २८ ते ३० टक्के होते. नाबार्डच्या अंदाजानुसार २०२५ मध्ये महाराष्ट्रात हे प्रमाण २२ ते २७ टक्क्यांच्या दरम्यान होते. अभ्यासाच्या सोयीसाठी हे प्रमाण सरासरी २५ टक्के धरले, तरी चित्र चिंताजनक दिसते. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नुसार २०२४-२५ मध्ये बँका, सोसायट्या आणि इतर अधिकृत संस्थांनी शेती क्षेत्राला १,७७,२०० कोटी रुपयांचे कर्ज दिले. ही रक्कम एकूण शेती कर्जाच्या ७५ टक्के धरली, तर एकूण शेती कर्ज सुमारे २,३६,२६७ कोटी रुपये होते. त्यातील २५ टक्के खासगी कर्ज मानल्यास खासगी शेती कर्जाची रक्कम ५९ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक ठरते. म्हणजेच खासगी कर्जाची शेतीवरील पकड अजूनही मजबूत आहे, हे वास्तव यातून स्पष्ट होते. देशात अशा कर्जाचे प्रमाण हळूहळू कमी होत असले, तरी महाराष्ट्रात हा प्रश्न अजूनही गंभीर आहे, हे देखील त्यातून दिसते. खासगी कर्ज घेणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने लहान आणि सीमान्त शेतकरी आहेत. महाराष्ट्रातील एकूण शेतकऱ्यांची संख्या सुमारे १ कोटी ६० लाख इतकी मानली, तर त्यापैकी किमान ८० टक्के म्हणजे सुमारे १ कोटी २८ लाख शेतकरी लहान किंवा सीमान्त गटातील आहेत. खासगी कर्जदारांमध्ये या गटाचा वाटा ७५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. मोठे शेतकरी तुलनेने बँका किंवा सोसायट्यांकडून कर्ज घेऊ शकतात; पण लहान शेतकऱ्यांसाठी औपचारिक कर्जव्यवस्था अनेकदा अप्राप्य ठरते. यामागील पहिले आणि अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे तारणाचा प्रश्न. बँका आणि सोसायट्या काही तारण ठेवल्याशिवाय कर्ज देत नाहीत. लहान शेतकरी गरीब वर्गातील असल्याने त्याच्याकडे पुरेसे तारण नसते. त्यामुळे दीर्घ मुदतीचे कर्ज त्याला मिळणे हे जवळपास अशक्यच असते. या शेतकऱ्यांना कर्ज न मिळण्यामागील दुसरे कारण म्हणजे बँकांची कार्यपद्धती. अर्ज, कागदपत्रे, तपासणी, मंजुरी आणि कार्यालयीन विलंब यामुळे शेतकऱ्याला प्रक्रिया कठीण वाटते. याउलट सावकाराकडून कर्ज घेणे सोपे, तत्काळ आणि वैयक्तिक ओळखीवर शक्य होते. त्यामुळे शेतकरी अनौपचारिक कर्जाकडे वळताना दिसतो. तिसरे कारण जमीनमालकीशी संबंधित आहे. अनेक ठिकाणी जमीन मालक आणि प्रत्यक्ष शेती करणारा शेतकरी वेगळा असतो. बँकेचे कर्ज जमीनमालकाला मिळते. मालक कर्ज घ्यायला तयार नसेल, तर जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला औपचारिक कर्ज मिळत नाही. त्याला नाइलाजाने खासगी कर्ज घ्यावे लागते. चौथे आणि अधिक मूलभूत कारण म्हणजे शेतजमिनीचे अव्यवहार्य आकारमान. महाराष्ट्रात सरासरी शेतजमीन सुमारे तीन एकर आहे. लाखो शेतकऱ्यांकडे अडीच ते पाच एकरांपेक्षा कमी जमीन आहे. अशा क्षेत्रावर शेती करून खर्च, उत्पन्न आणि कर्जफेड यांचा ताळमेळ बसत नाही.खासगी कर्जाचे व्याजदरही शेतकऱ्याला अधिक अडचणीत टाकतात. कागदोपत्री दर ९ ते १२ टक्के सांगितला जातो; पण अनौपचारिक व्यवहारांमध्ये तो २४ टक्क्यांपेक्षा अधिक असतो. काही ठिकाणी तो अत्यंत अवाजवी पातळीवर जातो. परिणामी मूळ कर्जापेक्षा व्याजाचे ओझे मोठे होते. उत्पन्न वाढत नाही; पण व्याज आणि कर्ज वाढत राहते. यामुळे शेतकरी कायमच्या कर्जजाळ्यात अडकतो. या स्थितीचे दुष्परिणाम दूरगामी आहेत. लहान तुकड्यांतील शेतीला दीर्घ मुदतीचे भांडवल मिळत नाही. त्यामुळे सिंचन, यांत्रिकीकरण, सुधारित बियाणे, साठवणूक आणि मूल्यवर्धन अशा विकासाच्या शक्यता मर्यादित राहतात. शेतीचा विकास खुंटतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची गती मंदावते. दारिद्र्य निर्मूलनातही अडथळे येतात.

**– अनिल पडोशी**

# भारताने गाजवले राष्ट्रकुल : नव्या क्रीडायुगाची दमदार चाहूल

ग्लासगो येथे पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताने केलेली कामगिरी प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद ठरली आहे. तब्बल ३९ पदकांसह भारताने चौथे स्थान पटकावत जगाला आपल्या वाढत्या क्रीडा सामर्थ्याची जाणीव करून दिली. यंदाच्या स्पर्धेत १२२ सदस्यीय भारतीय संघाने १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्य अशी पदकांची कमाई केली. ही कामगिरी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून भारतातील क्रीडा संस्कृती अधिक व्यापक होत असल्याचे स्पष्ट संकेत देणारी आहे.

यापूर्वी भारताची ओळख प्रामुख्याने कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन, बॉक्सिंग किंवा हॉकीपुरती मर्यादित होती. मात्र यंदाच्या स्पर्धेत बॉक्सिंग, ज्युडो, पॅरा-ॲथलेटिक्स, वेटलिफ्टिंग आणि ॲथलेटिक्ससारख्या विविध प्रकारांमध्ये भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळवले. त्यामुळे भारत आता काही मोजक्या खेळांपुरता मर्यादित नसून विविध क्रीडा प्रकारांत सातत्याने प्रगती करत असल्याचे दिसून आले.

भारतीय बॉक्सरांनी यंदा सर्वाधिक प्रभाव पाडला. सात सुवर्णांसह एकूण दहा पदके जिंकत त्यांनी भारताच्या यशात सिंहाचा वाटा उचलला. पुरुषांसोबतच महिला बॉक्सरांनीही दमदार कामगिरी करत भारतीय क्रीडाक्षेत्रातील महिलांची वाढती ताकद पुन्हा सिद्ध केली. महिलांना योग्य प्रशिक्षण, संधी आणि प्रोत्साहन दिल्यास त्या जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात, हे त्यांनी कृतीतून




दाखवून दिले.

ज्युडोमध्ये भारताने प्रथमच आपली ठोस छाप उमटवली. हा खेळ भारतासाठी तुलनेने नवीन असला तरी भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट तंत्र, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर पदके मिळवत नवा इतिहास घडवला. भविष्यात या खेळात भारत अधिक मोठे यश मिळवू शकतो, अशी आशा या कामगिरीने निर्माण केली आहे.

वेटलिफ्टिंगमध्ये भारतीय खेळाडूंनी पुन्हा एकदा आपली परंपरा कायम राखली. मीराबाई चानूसारख्या खेळाडूंनी सुवर्णपदक जिंकून भारतीय वेटलिफ्टिंगची ताकद अधोरेखित केली. ॲथलेटिक्समध्ये अपेक्षेप्रमाणे सर्वच स्पर्धांमध्ये यश मिळाले नसले, तरी काही खेळाडूंनी जिद्दीने पदके जिंकून भविष्यासाठी आशेचा किरण दाखवला. पॅरा-ॲथलेटिक्समध्ये भारतीय खेळाडूंची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली. शारीरिक अडचणींवर मात करून त्यांनी मिळवलेले यश केवळ पदकांपुरते मर्यादित नाही, तर ते संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या चिकाटीने आणि मेहनतीने भारतीय क्रीडाविश्वाला नवी ऊर्जा दिली आहे.

भारताच्या या यशामागे अनेक वर्षांची मेहनत, सुधारलेली क्रीडा धोरणे, अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा, खेळाडूंना मिळणारा आर्थिक पाठिंबा आणि प्रशिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. 'खेळो इंडिया', 'टार्गेट ऑलिम्पिक पोडियम' यांसारख्या उपक्रमांमुळे देशात गुणवंत खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळत आहे. ग्रामीण भागातील प्रतिभावान खेळाडूंनाही आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळू लागली आहे.

तरीही काही आव्हाने कायम आहेत. ॲथलेटिक्स, जलतरण, जिम्नॅस्टिक्स, सायकलिंग यांसारख्या खेळांमध्ये भारताला अजून मोठी झेप घ्यायची आहे. अनेक राज्यांमध्ये दर्जेदार क्रीडा सुविधा, प्रशिक्षक आणि आधुनिक प्रशिक्षण केंद्रांची कमतरता आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना आर्थिक मदत, पोषण आणि स्पर्धेच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेतील भारताची ही कामगिरी आगामी आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिकसाठी सकारात्मक संकेत देणारी आहे. पदकांची संख्या वाढवण्याबरोबरच जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यावर भर दिला, तर भारत क्रीडाक्षेत्रातील महासत्ता बनण्याचे स्वप्न निश्चितच साकार करू शकतो.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधील भारताचे यश हे केवळ पदकांचे यश नाही; ते भारतीय खेळाडूंच्या जिद्दीचे, मेहनतीचे आणि नव्या भारताच्या वाढत्या क्रीडा सामर्थ्याचे प्रतीक आहे. आता ही विजयी परंपरा कायम ठेवण्यासाठी सरकार, क्रीडा संघटना आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे खेळाडूंना अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# भारतात घटस्फोटांचे वाढते प्रमाण चिंताजनक !

भारताला लाभलेली प्राचीन हिंदू संस्कृती हे भारताचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या संस्कृतीचा भाग असलेली विवाहसंस्था जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही. विवाह पृथ्वीतलावर होत असले, तरी जोडीदाराच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात अशी समजूत भारतीयांत पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे घटस्फोट हा शब्द भारतीय शब्दकोशात कुठेही सापडत नाही. विवाह संस्काराच्या माध्यमातून सात जन्माची गाठ बांधली जाते, या संस्कारात देवाब्राह्मणांच्या साक्षीने जन्मभर एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे, एकमेकांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि घेतले जाते. या पवित्र संस्काराने बद्ध झालेले उभयता आयुष्यात येणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगांना नेटाने सामोरे जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देत संसाराचे गाडे हाकतात.

गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. भारतात वाढत जाणारे घटस्फोटांचे प्रमाणही याचीच फलश्रुती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, भारतात सेलिब्रेटी, राजकारणी, व्यायसायिक यांमध्ये घटस्फोट घडणे सामान्य बाब झाली असली तरी त्याचा प्रभाव हळूहळू सामान्य कुटुंबातही दिसू लागला आहे. २०२१ साली देशाच्या कौटुंबिक न्यायालयांत घटस्फोटांचे ५ लाख खटले प्रलंबित होते. २०२३ साली हीच संख्या ८ लाखांपर्यंत पोहोचल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. घटस्फोटाच्या खटल्यांत वर्षागणिक होत जाणारी वाढ भविष्यांत पश्चिमी देशांना मागे टाकू शकते अशी भीती निर्माण झाली आहे. दरवर्षी घटस्फोटांची जेव्हढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तरुण पत्नी पत्नी विभक्त झाल्याने सर्वाधिक परिणाम त्यांच्या अपत्यांवर होतात. अशा अपत्यांमध्ये एकलकोंडेपणा, द्वेष, चिडचिड करणे, सूडभावनेने वागणे यांसारखे दोष प्रकर्षाने दिसून येतात. घटस्फोटित पालकांची मुले नकळतपणे गुन्हेगारीकडे वळत असल्याचे निरीक्षणही अहवालात नोंदवण्यात आले आहे. पश्चिमी देशांच्या तुलनेने भारतात होणाऱ्या घटस्फोटांची टक्केवारी कमी असली, तरी आज या प्रकारांवर नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात ती भीषण स्वरूप धारण करू शकते,ज्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होऊ शकतो. विवाह करताना प्रत्येक मुलामुलीने आपल्या भावी आयुष्याबद्दल अनेक स्वप्ने रंगवलेली असतात या स्वप्नांचा चुराडा करणारा घटस्फोट कुणालाही नको असतो; मात्र तो आयुष्यात येण्यामागे कारणेही तितकी गंभीर असू शकतात.

शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरुण पती



पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो. घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. तो तितक्या प्रमाणात न मिळाल्यास लहान सहान प्रसंगांतून खटके उडू लागतात. खटक्यांचे रूपांतर वादात होते. कधी कधी हे वाद विकोपाला पोहोचतात. सातत्याने असे प्रसंग घडू लागल्यास जोडीदारासोबत राहणे नकोसे वाटू लागते. माघार घेण्याची सवय नसल्याने वितुष्ट वाढत जाऊन प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. नोकरीच्या निमित्ताने कार्यालयातील सहकारी तसेच कार्यालयाशी संबंधित व्यक्ती यांच्याशी सातत्याने संपर्क येत असल्याने काही वेळा पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध निर्माण होतात ज्यामुळे जोडीदारांत वाद होऊन नात्यात भेग निर्माण होते. काहीवेळा विवाहाआधी घडलेले प्रसंग, आजार किंवा जीवनातील एखादी गंभीर घटना याविषयी समोरच्यांशी मोकळेपणाने बोलले जात नाही. या गोष्टी विवाहानंतर लक्षात आल्यावर विश्वासघाताची भावना मनात निर्माण होऊन नात्यातील जवळीकता लोप पावू लागते. ज्याचे पर्यावसान पुढे वादांत आणि भांडणांत होऊन प्रकरण न्यायालयापर्यंत जाते. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहांना सरकाकडून प्रोत्साहन आणि संरक्षण दिले जात असले, तरी विवाहानंतर अचानक बदललेले राहणीमान, तेथील चालीरीती, खाण्या पिण्याच्या सवयी यांचा स्वीकार करताना संघर्ष होतो. आंतरधर्मीय विवाह करताना काहीवेळा जोडीदारावर धर्मपरिवर्तन करण्यास सक्ती केली जाते. असे विवाहही फार काळ टिकत नाहीत. याखेरीज पती पत्नींची मानसिक स्थिती, त्यांच्या सवयी, वागण्या बोलण्याच्या पद्धती, परस्परांच्या नातेवाईकांशी असलेली वर्तणूक यासुद्धा काही प्रमाणात घटस्फोटास कारणीभूत ठरू लागल्या आहेत. जोडीदाराला असलेली व्यसने त्याचा मित्रवर्ग यागोष्टीही लग्नाआधी ज्ञात नसल्यास गंभीर वादास कारणीभूत ठरतात.

पतिपत्नीचे नाते बहरण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे, परस्परांशी मनमोकळेपणाने बोलणे, एकमेकांना प्रोत्साहन देणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्प्यावर अत्यंत आवश्यक असतात. आपला अहंकार जपत राहिल्यास लहान सहान प्रकरणात विनाकारण मनात क्लेश निर्माण होऊन नात्यातील प्रेम लोप पावू लागते. आताच्या पिढीवर अनैतिकता पसरवणारे चित्रपट, कुटुंबव्यवस्थेला छेद देणाऱ्या मालिका, वासनांधतेने भरलेल्या वेब सिरीज यांचा प्रभाव अधिक आहे. विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांना तुच्छ लेखनाऱ्या या चित्रपट-मालिकांमध्ये विवाहबाह्य संबंध, गृहकलह, घटस्फोट यांसारखे विषय चवीने चघळले जातात. लिव्ह इन रिलेशिनशिपसारख्या पाश्चिमात्य विकृतीला देशात कायद्याचे संरक्षण असल्याने घटस्फोट घेणे किंवा एक जोडीदार असताना दुसऱ्यासोबत राहणे आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या पिढीला तितकेसे चुकीचेही वाटत नाही. भारतीय कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल, तर या व्यवस्थेचे लाभ महाविद्यालयीन शिक्षणातून शिकवले जायला हवेत त्यासोबतच चित्रपट, मालिका, वेब सीरिज यांतुन भारतीय संस्कृतीला छेद देणारे प्रसंग, कथानक, संवाद यांवर निर्बंध आणणे आज आवश्यक बनू लागले आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### भित्रा

कोसळे कधी कसा
मनात बसला भित्रा
सावध करीवेळेवरी
भुंकायले लागे कुत्रा

अस्वस्थकरे सकला
कारणे नव्याने सत्रा
गळायले लागेछप्परे
जागोजाग ठेवे पात्रा

विनंती अर्जकित्येक
केराची टोपली पत्रा
दिसत असून संकटे
बंद करुन टाके नेत्रा

कुणी देई आश्वासन
भिऊनकोस रे मित्रा
इलाजाचा नाईलाज
मुळी न सापडे मात्रा

रे सामान्य अत्यवस्थ
आमंत्रण दे कुरुक्षेत्रा
कृतज्ञता हवीच मनी
सांभाळावे अन्न छत्रा


कम कुवत होऊ नये
आव्हान नकोयं सूत्रा
फाटून जातील वस्त्रे
आधार दे मंगळसुत्रा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ...तमी

# ज्ञानमंदिराचे शिल्पकार डॉ.डी. वाय. पाटील हरपले...

समाजहिताच्या अत्यूच्च प्रेरणेने सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आनंदाचे, सुख, समाधानाचे मळे फुलवणारे शैक्षणिक क्षेत्रात डोंगराएवढे उत्तुंग काम करुन दाखवणारे सार्वजनिक पद हे वैयक्तिक लाभसाठी नसून लोकसेवेसाठी आहे असे मानून राज्यपालपदावर असताना केवळ एक रुपया वेतनावर काम करणारे महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आपल्या अमिट कर्तुत्वाचा ठसा उमटवणारे जेष्ठ शिक्षणमहर्षी आणि खऱ्या अर्थाने 'जगवेगळा माणूस' ठरलेले पद्मश्री डॉ.डी.वाय. तथा ज्ञानदेव यशवंतराव पाटील यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी कोल्हापुरात निधन झाले. त्यांचे जाणे महाराष्ट्राच्या समाजकारण



– राजकारण यासाह शिक्षण, वैद्यकीय, क्रीडा, शेती, सहकारासह सर्वच आघाडीच्या क्षेत्रातील प्रत्येक माणसाच्या काळजाला चटका लावणारे असून डी. वाय.समूहाचा पोशिंदा हरपल्याची भावना जनमानसात पसरली आहे. डॉ.डी.वाय.पाटील यांचा जन्म २२ ऑक्टोंबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील अंबप येथे सर्वसामान्य कुटुंबात झाला.

नेहमीच त्यांची चढती कमान राहिली कोल्हापूरचे नगरसेवक, आमदार, त्रिपुरा, बिहार, पश्चिम बंगालचे राज्यपाल असा त्यांचा प्रवास राहिला. त्यामुळे सोसायटीचे चेअरमन, आमदार ते थेट राज्यपाल पदापर्यंत मजल मारली होती अशा ध्येयवेड्या आणि ज्ञानमंदिराचे शिल्पकार ठरलेल्या डॉ.डी.वाय पाटील यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रासह त्यांचा चाहतावर्ग शोक सागरात बुडाला आहे. त्यांना विनम्र आदरांजली !

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# किसान इंटरनॅशनल स्कूलमध्ये '१० कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियान' उत्साहात संपन्न



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०५, सुपा (अहिल्यानगर) :** सध्याच्या धावपळीच्या युगात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी आणि समाज चिंतेच्या गर्तेत सापडला आहे. या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी आणि समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पारनेर येथील किसान इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रातर्फे '१० कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियानांतर्गत' विशेष व्यसनमुक्ती प्रतिज्ञा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. ब्रह्माकुमारी साधना दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे हे होते.

याशिवाय राम भाई, पत्रकार भगवान गायकवाड आदी मान्यवर विशेष उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मिळून एकसंधपणे व्यसनमुक्त समाज घडविण्याचा दृढ संकल्प केला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी सांगितले की, आजच्या काळात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे विद्यार्थी, युवक तसेच संपूर्ण समाजावर अत्यंत गंभीर परिणाम होत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच व्यसनाधीनतेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, त्यांनी मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा स्वीकार करावा आणि एका निरोगी समाजाची निर्मिती व्हावी, याच उद्देशाने प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयातर्फे हे देशव्यापी महाअभियान राबवले जात आहे. आजचा भारत हा प्रचंड ताणतणाव आणि मानसिक अस्वस्थतेमुळे त्रस्त झाला आहे. या तणावातून बाहेर पडण्यासाठी अनेक व्यक्ती चुकीच्या मार्गाने व्यसनांच्या आहारी जातात; परंतु व्यसन केल्यामुळे टेन्शन कधीही कमी होत नाही, तर उलट ते आणखी वाढते, असा महत्त्वपूर्ण संदेश दीदींनी दिला. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी ब्रह्माकुमारी विद्यालयाने राबवलेल्या अभियानांतर्गत आतापर्यंत देशभरात ४ कोटी लोकांपर्यंत पोहोचण्यात यश आले असून, त्यापैकी तब्बल ३ कोटी लोकांनी व्यसनांना कायमचा राम राम ठोकून व्यसनमुक्त जीवन स्वीकारले आहे, ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची व गौरवाची बाब आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.येत्या २५ ऑगस्ट रोजी विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणीजी यांच्या स्मृतीनिमित्त खरी श्रद्धांजली तेव्हाच अर्पण ठरेल, जेव्हा आपण सर्वजण मिळून या 'नशा मुक्त भारत अभियानाचे' रूपांतर एका विराट जनआंदोलनात करू. हे अभियान भविष्यात विश्वरूप धारण करेल आणि खऱ्या अर्थाने आपला भारत देश पूर्णपणे 'नशा मुक्त' बनेल, असा दृढ विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना आयुष्यभर व्यसनमुक्त राहण्याची आणि आपल्या परिसरातील इतरांनाही व्यसनमुक्तीसाठी प्रेरणा देण्याची सामूहिक शपथ व प्रतिज्ञा देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये सकारात्मक ऊर्जेचा संचार पाहायला मिळाला.

# आ.देवतळे यांची केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यांच्याशी सकारात्मक चर्चा

## प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, वरोरा (चंद्रपूर) :** नवी दिल्ली येथे वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राचे आ. करण देवतळे यांनी अलीकडेच केंद्रीय कोळसा व खाण मंत्री ना. जी. किशन रेड्डी यांची सदिच्छा भेट घेऊन कोल इंडिया आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडशी संबंधित विषय महत्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली.

या बैठकीला माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहीर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत प्रामुख्याने कोल इंडिया आणि वेकोलिच्या प्रकल्पग्रस्त तसेच स्थानिक बेरोजगारांच्या प्रलंबित मागण्यांवर भर देण्यात आला. जमीन संपादनाचा योग्य मोबदला आणि पात्र कुटुंबांना नोकरी मिळण्याबाबतच्या अडचणी आ. करण देवतळे यांनी मंत्र्यांसमोर मांडल्या. जमीन संपादनाचा मोबदला नोकरीसह प्रति एकरी तीस लाख रुपये करण्यात यावा, ही गेल्या अनेक वर्षापासूनची प्रलंबित मागणी त्यांनी पुन्हा लावून धरली. यासोबतच केपीसीएल आणि अरबिंदो या खाजगी कंपन्यांकडून स्थानिक लोकांची होत असलेली पिळवणूक, रखडलेल्या नोकऱ्या, प्रलंबित मोबदला, पुनर्वसन आणि वेतनाचे प्रश्न यावरही चर्चा झाली. कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड आणि अरबिंदो कंपनीकडून उत्खनन कराराचे उल्लंघन आणि अधिक उत्पादनातून होणारी अफरातफर यासारखे गंभीर प्रकार समोर येत असल्याचे आमदारांनी सांगितले. याबाबत 'केल कंट्रोलर' मार्फत चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. प्रकल्पग्रस्तांच्या सर्व समस्यांवर एकत्रित तोडगा काढण्यासाठी नागपूर येथे वेकोलिची विशेष बैठक तातडीने आयोजित करण्यात यावी, अशी सूचना देखील माननीय मंत्र्यांना देण्यात आली.

बैठकीच्या समारोपात वेकोली व इतर औद्योगिक प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या शेतकरी व नागरिकांच्या पुनर्वसन, रोजगार, नुकसान भरपाई आणि मुलभूत सुविधांसह विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन केंद्रीय मंत्र्यांना सादर करण्यात आले. यावेळी बोलताना आ. करण देवतळे म्हणाले की, कोळसा खाण क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक आणि तातडीने निर्णय झाल्यास हजारो कुटुंबांना दिलासा मिळेल. माजी मंत्री हंसराज अहीर यांनीही प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने ठोस भूमिका घेण्याची विनंती केंद्रीय मंत्र्यांकडे केली.

केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यानी सर्व मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले असून संबंधित विभागाशी चर्चा करुन लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले, अशी माहिती आ. करण देवतळे यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली.

# आ. मुनगंटीवारांच्या पुढाकारामुळे ४५ लाखांच्या निधीतून साकारले भव्य प्रवेशद्वार

## श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन मानवतेचा आदर्श; प्रवेशद्वार हे केवळ वास्तू नव्हे, तर प्रेरणेचे स्मारक - आ. मुनगंटीवार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूरातील तुकूम येथील श्री गुरुनानक दरबार गुरुद्वारासमोरील 'श्री गुरु तेग बहादुरजी हिंद-दी-चादर प्रवेशद्वार' उभारणीसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून ४५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देणारे राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा गुरुद्वारा समितीच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यात आला. गुरु तेग बहादुरजींच्या प्रकाश उत्सवानिमित्त साकारलेल्या या भव्य प्रवेशद्वाराच्या लोकार्पणानंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना आ.मुनगंटीवार यांनी हे प्रवेशद्वार केवळ वाहतुकीसाठी उभारलेली वास्तू नसून, शौर्य, त्याग, मानवता, सेवाभाव आणि धर्मरक्षणाचा संदेश प्रत्येकाच्या हृदयापर्यंत पोहोचवणारे प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. तसेच गुरु तेग बहादुरजींचे बलिदान संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श असून त्यांच्या स्मृतीला अभिवादन करणारे हे प्रवेशद्वार उभारण्याचे भाग्य लाभल्याचा अभिमानही त्यांनी व्यक्त केला.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या अथक प्रयत्नांतून श्री गुरु तेग बहादुरजी हिंद-दी-चादर यांच्या प्रकाश उत्सवानिमित्त या भव्य प्रवेशद्वाराची उभारणी करण्यात आली. या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन २६ जानेवारी २०२४ रोजी आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गुरुद्वारा श्री गुरुनानक दरबारसमोर हे भव्य प्रवेशद्वार साकार झाले असून, त्यास 'श्री गुरु तेग बहादुरजी हिंद-दी-चादर प्रवेशद्वार' असे नामकरण करण्यात आले आहे. दि.०४ ऑगस्ट २०२६ रोजी गुरुद्वारा समितीच्या वतीने आयोजित समारंभात आ. मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते या प्रवेशद्वाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी अर्जुन सिंग धुन्ना आणि श्रीमती दशमीत वाधवा यांनी गुरु तेग बहादूरजींच्या जीवनावर आधारित सादर केलेल्या प्रभावी कार्यक्रमाचा उल्लेख करताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, हे सादरीकरण पाहताना आपण इतिहासातील त्या गौरवशाली काळात पोहोचलो. गुरु तेग बहादूरजींना 'हिंद-दी-चादर' ही उपाधी का प्राप्त झाली, याची खरी अनुभूती या सादरीकरणातून मिळाली. त्याग, बलिदान, धर्मरक्षण आणि मानवतेसाठी संपूर्ण जीवन अर्पण करणाऱ्या गुरु तेग बहादूरजींचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. या उत्कृष्ट सादरीकरणासाठी त्यांनी अर्जुन सिंग धुन्ना व दशमीत वाधवा यांचे विशेष अभिनंदन केले. शीख समाजाच्या परंपरेचा गौरव करताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, शौर्य, मानवता आणि निःस्वार्थ सेवेची शिकवण जगाला देण्याचे कार्य शीख समाजाने केले आहे. लंगराच्या परंपरेतून 'भुकेल्याच्या पोटातच देव वसतो' हा संदेश दिला जातो. खऱ्या अर्थाने ईश्वराची भक्ती करायची असेल, तर प्रथम भुकेल्याला अन्न द्यावे, त्यातूनच ईश्वर प्रसन्न होतो, हा शीख परंपरेचा महान संदेश संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक आहे.

अशा महान विभूतीच्या स्मरणार्थ हे भव्य प्रवेशद्वार उभारण्याचे भाग्य लाभल्याचा अभिमान व्यक्त करत, गुरुद्वारा समिती, शीख समाज आणि उपस्थित नागरिकांनी व्यक्त केलेल्या प्रेम, आत्मीय स्वागत आणि सन्मानाबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी खालसा हेल्प फाउंडेशन टीम तेजेंदर सिंघ दारी, अर्जून सिंग धुना,बलबीर सिंह गुरोन, चिंटू गढ़ोंक, पुरण सिंघ जुनेजा, सोनू अनेजा,राजू सचदेवा, नीतू बावरे, श्री गुरुद्वारा गुरुनानक दरबार कमेटी चे आभार मानले.याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, हरविंदर सिंघ धुन्ना , काशिनाथ सिंग, सुनील डोंगरे यांच्यासह गुरुद्वारा समितीचे पदाधिकारी, शीख समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेकायदेशीर गर्भलिंग निदानाविरोधात जनजागृती मोहीम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, ठाणे :** समाजात मुलगा-मुलगी समानतेची भावना अधिक दृढ व्हावी आणि बेकायदेशीर गर्भलिंग निदानासारख्या गंभीर सामाजिक गुन्ह्यांना आळा बसावा, या उद्देशाने काल दि.०४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे आर. डी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे चे सचिव रविंद्र एस. पाजणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे येथे 'बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रतिबंध' या विषयावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रशिक्षणात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव रविंद्र एस. पाजणकर यांनी प्रस्तावना करून सुरूवात केली. यावेळी त्यांनी विधी स्वयंसेवकांना समाजात जावून नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्याचे आणि कायद्याबाबत योग्य मार्गदर्शन करून अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्याचे आवाहन केले.त्यानंतर प्रशिक्षक म्हणून ॲड. अर्चना शेगोकर यांनी स्लाईड शो द्वारे विधी स्वयंसेवकांना 'बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रतिबंध' या कायद्यावर मार्गदर्शन केले. समाजात कुठेही बेकायदेशीर गर्भलिंग निदानाची घटना घडत असलेली आढळल्यास त्वरीत जवळील वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडे माहिती देण्याबाबत त्यांनी विधी स्वयंसेवकांना आवाहन केले. त्यानंतर प्रशिक्षक म्हणून समाजसेवक रघुनाथ देशमुख यांनी आपल्या काव्यशैलीचा वापर करून 'बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रतिबंध' या विषयावर लिंगानुपात, स्त्री भ्रूणहत्या आणि गर्भलिंग निदानामुळे होणाऱ्या गंभीर सामाजिक परिणामांवर सखोल चर्चा केली. आपल्या प्रशिक्षणात बेकायदेशीर गर्भलिंगनिदान या विषयावर त्यांनी स्वतः लिहीलेल्या दोन-तीन कविता सादर केल्या.

# थोडक्यात बातम्या

## एसआरआय अंतर्गत मतदान केंद्र व बूथ पुनर्रचनेची मागणी निवडणूक अधिकाऱ्यांची भाजप शिष्टमंडळानी घेतली भेट



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनर्पडताळणी अभियानाअंतर्गत चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रे व बूथ पुनर्रचनेतील त्रुटी दूर करण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या सूचनेनंतर भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने मंगळवारी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांची भेट घेत सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे महामंत्री रविंद्र गुरनुले, उपाध्यक्ष बलराम डोडाणी, बीएलओ वन सुमित बेले, प्रलय मशाखेत्री, ईश्वर वाघमारे, आदिंची उपस्थिती होती.

निवेदनात विविध भागांतील मतदारांना त्यांच्या वास्तव्यास असलेल्या परिसरापासून दूर मतदान केंद्रे देण्यात आल्यामुळे मतदानाच्या दिवशी अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे मतदारांच्या सोयीचा विचार करून मतदान केंद्रे व बूथचे पुनर्नियोजन करण्याची मागणी करण्यात आली.। शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनानुसार, हनुमान नगर, गणेश नगर, रामकृष्ण टॉकीज परिसर व बेलोरा येथील काही मतदारांना सध्या जनता शाळा, सिव्हिल लाईन येथील मतदान केंद्र देण्यात आले असून, त्याऐवजी जवळील डॉन बॉस्को शाळा, पोलीस कल्याण सभागृह किंवा संकल्प याचिका कार्यालय येथे मतदान केंद्र निश्चित करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच सराई वॉर्ड व जवळपुरा परिसरातील मतदारांसाठी पोलीस कल्याण सभागृहाऐवजी जनता शाळा, सिव्हिल लाईन येथे मतदान केंद्र निश्चित करावे, अशीही मागणी करण्यात आली.

याशिवाय रायपुरा नगर, धंगड नगर व तुळशी नगर येथील मतदार सध्या वेगवेगळ्या बूथमध्ये विभागले गेले असल्याने त्या परिसरासाठी स्वतंत्र मतदान केंद्र किंवा बूथ निर्माण करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली.

सदर प्रक्रियेदरम्यान एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या बूथमध्ये गेल्यामुळे भविष्यात ठस्व् यांच्याशी संपर्क, निवडणूक व्यवस्थापन तसेच मतदानासाठी नागरिकांना अनावश्यक गैरसोय होणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. त्यामुळे शक्य त्या ठिकाणी एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे एकाच बूथवर समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. आ. किशोर जोरगेवार यांनी मतदारांच्या सोयीसाठी प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून आवश्यक त्या दुरुस्त्या तातडीने करण्याच्या सूचना दिल्यानंतर भाजपच्या शिष्टमंडळाने हे निवेदन सादर केले. यावर निवडणूक प्रशासनाने सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

## महसूल दिनी शिरपूरचे उपविभागीय अधिकारी सन्मानित उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी पुरस्काराने चौथ्यांदा गौरव



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०५, शिरपूर :** शिरपूर महसूल विभागात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत महसूल दिनानिमित्त शिरपूर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी यांना 'उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्यकाळातील हा चौथा मानाचा सन्मान ठरला असून, प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे त्यांना हा बहुमान प्राप्त झाला आहे.

शिरपूर उपविभागात गेल्या दोन वर्षांत त्यांनी विविध लोकाभिमुख व परिणामकारक उपक्रम राबविले. विशेषतः पोलीस पाटील सेवा अभिलेख प्रणाली विकसित करून ती राज्यात प्रथमच यशस्वीपणे कार्यान्वित करण्याची अभिनव संकल्पना त्यांनी साकारली. या उपक्रमाची दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या हस्ते त्यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला होता. त्यानंतर शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दलही त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली. या उल्लेखनीय योगदानासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी त्यांना पुन्हा विशेष पुरस्काराने गौरविले.

आता महसूल दिनानिमित्त मिळालेला 'उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी' पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा सलग चौथा सन्मान ठरला आहे. प्रशासनातील पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, लोकाभिमुख निर्णयप्रक्रिया आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे शिरपूर उपविभागाने राज्यभरात वेगळी ओळख निर्माण केली असून, त्यांच्या या यशाबद्दल राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा पालकमंत्री जयकुमार रावल, धुळे नंदुरबार विधान परिषदेचे आमदार अमरिषभाई पटेल, शिरपूर विधान सभेचे आमदार कांशीराम पावरा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते अप्पर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी संदिप पाटील, महादेव खेडकर, गंगाराम तळपाडे, किशोर कदम, चंद्रशेखर देशमुख, संजय बागडे उपविभागीय अधिकारी धुळे रोहन कुवर, यांच्यासह विविध तहसीलदार, नायब तहसीलदार, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी, महसूल सहायक, आदींसह महसूल विभागासह विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## राज्यात अनलॉग पनीरवर बंदी तुकाराम मुंढे यांचा सर्वात मोठा दणका

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. तुकाराम मुंढे यांनी राज्यात अनलॉग पनीरवर पुढच्या वर्षभरासाठी बंदी घातली आहे. अनलॉग पनीर हे दुग्धजन्य पदार्थ नाही. ते वनस्पती किंवा पामतेलचा वापर करुन तयार करण्यात आलं असतं. पण पनीर समजून ते नागरिकांना खायला दिलं जाऊ शकतं. पनीर की अनलॉग पनीर हे सर्वसामान्य नागरीक बऱ्याचदा ओळखू शकत नाहीत. तसेच ते आरोग्यासाठी घातक आहे. त्यामुळे अनलॉग पनीरवर बंदी घालण्यात आली असल्याचं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं आहे. अनलॉग पनीरवर एक वर्ष बंदी

कायद्याने दिलेल्या अधिकाऱ्यानुसार महाराष्ट्रात ३० जुलै २०२६ रोजी नोटीफिकेशन काढून अनलॉग पनीर किंवा नॉन डेअरी पनीर याच्या उत्पादन प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर एक वर्षासाठी बंदी घातली आहे. एक वर्षानंतर रिव्ह्यू केला जाईल आणि पुन्हा बंदी ठेवायची का याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा तुकाराम मुंढे यांनी केली.

अनलॉग पनीरबाबत वारंवार चर्चा झाली आहे. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर याबाबत चर्चा झाली आहे. त्याअनुषंगाने गेल्या वर्षभरात मार्केटमधून काही सॅम्पल्स घेतले होते. एकूण ३०८ नमुने टेस्ट केले. त्यापैकी १०९ नमुने हे नियमबाह्य आढळले. त्यापैकी अनेक असुरक्षित आढळले. त्याचा परिणाम आरोग्यावर होतो, असं तुकाराम मुंढे म्हणाले.